LINTAS
LINOPINION PUBLIC RELATIONS



| | |
|---|---|
| PUBLICATION | PUDHARI |
| SUPPLEMENT | MY MUMBAI |
| EDITION | MUMBAI |
| DATE | 31-07-2010 |
| PAGE NO | 02 |



# मध्यमवर्गीयही बाळगतात दोन कार :मुख्यमंत्री

◆ प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यात आज प्रत्येक सधन कुटुंबाकडे चार ते पाच कार असून सामान्य माणूसही आज दोन -दोन कार बाळगून असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी गुरुवारी रात्री येथे बोलताना केले. राज्यात उद्योगासाठी चांगले वातावरण असून नव्या उद्योजकांचे नेहमीच स्वागत केले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

भारतातील निद्रा उत्पादनातील पॉलिफ्लेक्स या कंपनीबरोबर इटलीच्या मॅग्निफ्लेक्स या कंपनीने भागीदारी केली आहे. यानिमित्ताने आयटीसी ग्रँडमध्ये आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. आज दोन ते तीन वर्षात गाड्या बदलल्या जात आहेत. सधन कुटुंबांकडे प्रत्येक माणसासाठी गाडी आहे. एवढेच काय तर मध्यमवर्गीय माणूसही आज दोन- दोन गाडया वापरत आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. भारत आणि इटलीचे सबंध नेहमीच सौहार्दाचे राहिले असून औद्योगिक भागिदारी आणि गुंतवणूकीतून ते अधिक वृद्धींगत होत आहेत. दोन कंपन्यांबरोबर दोन देशही जवळ येत आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मॅग्निफ्लेक्सचे जागतिक विक्री व्यवस्थापक मार्को मॅग्नी, पॉलिफ्लेक्स कंपनीचे अध्यक्ष निचानी उपस्थित होते. भारतीय बाजारपेठेत प्रवेश करताना आम्हाला अतिशय आनंद होत असून आमच्यासाठी ही बाजारपेठ अतिशय महत्त्वाची असल्याचे मॅग्नी म्हणाले.